ePaper

# राज्याचे लक्ष बारामतीकडे! पवार विरुद्ध पवार लढतीची उत्सुकता!



|| वर्ष - 7 | अंक - 316 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!

आतील पानांत


- धोनीमुळे चेन्नईच्या संघाचे नुकसान
- तेव्हा माझं करिअर संपेल सलमान खान
- 'आप'ने खलिस्तानकडून निधी घेतला
- वडेट्टीवारांविरोधात भाजपा आक्रमक!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 7 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळावा उत्साहात

# उद्धव ठाकरे हेच खरे गद्दार!

### देवेंद्र फडणवीसः मोदींच्या विकासाच्या सुपरफास्ट इंजिनला मावळची बोगी जोडा

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी प्रतारणा करणारे उद्धव ठाकरे हे खरे गद्दार आहेत. बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार बारणे व त्यांचे सहकारी हे तर खुद्दार आहेत, अशी कोटी करीत भाजपचे वरिष्ठ नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकास्त्र सोडले. मावळातील महाविकास आघाडीचा उमेदवार कोणत्या शिवसेनेत पैदा झाला, असा सवाल करीत उबाठाच्या दुटप्पीपणावर त्यांनी बोट ठेवले. महायुतीच्या विकासाच्या सुपरफास्ट गाडीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे इंजिन आहे. त्याला मावळची बोगी जोडण्याचे काम मतदारांनी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये रहाटणी येथील कापसे लॉन्स येथे महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात फडणवीस बोलत होते.

व्यासपीठावर खासदार बारणे, भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, रामटेकचे खासदार कृपाल तुमने, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, बाळा भेगडे, आमदार महेशदादा लांडगे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख नीलेश तरस, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, आरपीआयच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत सोनकांबळे, शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, तसेच सदाशिव खाडे, रवींद्र भेगडे, भाऊसाहेब भोईर, संदीप वाघेरे, प्रशांत शितोळे, नाना काटे, नामदेव ढाके, सुजाता पालांडे, चंद्रकांत नखाते, शीतल शिंदे, माई ढोरे, सुरेखा जाधव, राजेश पिल्ले, प्रमोद ताम्हणकर, राज तापकीर, मोरेश्वर शेडगे, मोरेश्वर भोंडवे, काळूराम बारणे आदी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गल्ली-बोळाची निवडणूक नाही

**उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही गल्ली-बोळाची निवडणूक नाही. ही देशाची निवडणूक आहे. आम्ही विकासाचे मुद्दे मांडत असताना महाविकास आघाडी मात्र गद्दार, खुद्दार, बोके, खोके या पलीकडे बोलायलाच तयार नाही. काँग्रेस बरोबर जायची वेळ येईल, तेव्हा मी हे दुकान बंद करून टाकीन, असे वक्तव्य बाळासाहेब ठाकरे यांनी केले होते. त्यांच्या विचारांना हरताळ फासत सत्तेसाठी काँग्रेसशी हात मिळवणी करणारे उद्धव ठाकरे हे खरे गद्दार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार बारणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्वाच्या विचारांशी कायम निष्ठा ठेवली आहे. त्यामुळे ते खरे खुद्दार आहेत.**

## पिंपरी-चिंचवड पोलिसांची मोठी कारवाई

### दरोडा विरोधी पथकाने केले पिस्तूल खरेदी-विक्रीचे रॅकेट उद्ध्वस्त

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

ऐन निवडणुकीच्या काळात पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दरोडा विरोधी पथकाने मोठी कारवाई करीत वेपन डीलरसह चौघांना अटक करून त्यांच्याकडून सात पिस्तूल आणि पाच काडतुसे जप्त केली आहेत.



शस्त्रांची शहरात होणारी खरेदी-विक्रीला काही अंशी ब्रेक लागला आहे. अर्जुन भाऊराव सूर्यवंशी (वय २०, रा. आळंदी), तुषार नथुराम बच्चे (वय ३१, रा. शिवाजीवाडी, मोशी), कमल रामदास राठोड (वय २६, रा. नाणेकरवाडी, ता. खेड), अंकित भस्के अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. बाळासाहेब कोपनर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दरोडा विरोधी पथकातील गणेश सावंत, सुमित देवकर आणि विनोद वीर यांना मरकळ गाव येथे एक गुन्हेगार पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली.

### मोशी येथून घेतले ताब्यात

त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने वेपन डीलर अंकित भस्के याच्याकडून हे पिस्तूल विकत आणले असल्याचे सांगितले. सूर्यवंशी याने भस्के याच्याकडून आणखी दोन पिस्तूल आणि काडतूस विकत घेऊन ते सराईत गुन्हेगार तुषार बच्चे याच्याकडे ठेवण्यास दिल्याचेही त्याने तपासात सांगितले. पोलिसांनी मोशी येथून बच्चे याला ताब्यात घेत त्याच्याकडून दोन पिस्तूल आणि एक काडतूस जप्त केले.

## शिरुरची जनता हुशार; फसणार नाही

# अमोल कोल्हेंचे राजकीय नाटक ‘फ्लॉप’

## निवडणूक रणसंग्राम : उपमुख्यमंत्री फडणवीस यांची टीका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिरुरमधल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांनी अमोल कोल्हेंवर जोरदार टीका केली आहे. शिवाजीराव अढळराव पाटील यांच्या प्रचारसभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशहिताचे निर्णय कसे घेतले ते सांगितलं. त्यानंतर त्यांनी अमोल कोल्हेंवर जोरदार टीका केली.अमोल कोल्हे यांचा उल्लेख नाटकी माणूस असा त्यांनी केला.**



त्यांचं हे वक्तव्य चर्चेत आलं आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ” आढळराव पाटील यांनी मागच्या पंधरा वर्षांत किती प्रश्न विचारलेत तुम्ही रेकॉर्ड बघा. बैलगाडा शर्यत बंद झाली होती अडीच वर्षे महाविकास आघाडीचं सरकार होतं त्यांनी काहीही केलं नाही. आपलं सरकार परत आलं आणि आपण बैलगाडा शर्यत सुरु केली. त्यामागेही आढळराव पाटील यांचेच प्रयत्न होते. आता त्यांच्यावर आरोप केला जातो की पक्ष बदलला. मात्र आज तुम्हाला मी सत्य सांगतो, मी, अजित पवार आणि एकनाथ शिंदे एकत्र बसलो. ही जागा राष्ट्रवादीच्या कोट्यात गेली. शिवसेनेचाही आग्रह होता. शेवटी मधला मार्ग काढला सीट राष्ट्रवादीच्या कोट्यात असली तरीही उमेदवार आढळराव पाटील यांनाच करु. दोन्ही पक्षांना समाधान वाटेल.

### अमोल कोल्हेंवर टीका

जे आमच्यावर टीका करत असतील तर जरा त्यांनी समोरच्या उमेदवाराला (अमोल कोल्हे) विचारा की त्यांनी किती वेळा निष्ठा बदलल्या. गेल्या पाच वर्षांत किती वेळा फेसबुक पोस्ट टाकल्या आणि कुठे जाणार होते आणि कसे थांबले ते आम्ही सांगायला लागलो तर त्यांचा चेहरा उघड होईल. मात्र एक गोष्ट आहे आढळरावांपेक्षा एक गोष्ट त्यांना (अमोल कोल्हे) चांगली जमते. आढळराव नाटक करत नाहीत. ते एवढं नाटकी आहेत की त्यांना रडता येतं, हसता येतं, जुमलेबाजी करता येते, बोलता येतं, जुमलेबाजी करता येते. पण एक लक्षात ठेवा, लोक नाटकाचं तिकिट घेऊन एकदा नाटक बघायला जातात. पण नाटक फ्लॉप असेल तर कुणीही नाटक

### शिरुरचे लोक खूप हुशार आहेत

शिरुरचे लोक खूप हुशार आहेत. पाच वर्षे हा व्यक्ती (अमोल कोल्हे) या ठिकाणी फिरकलाही नाही. आता ते गावोगावी जात आहेत. पण शिरुरचे लोक त्यांना विरोध वगैरे करत नाहीत. शिव्याही देत नाही, बोलवतात, स्वागत करतात, हार घालतात आणि सत्कार करतात. समोरच्याला वाटतं वा काय स्वागत झालंय माझं. पण सत्कार झाल्यावर विचारतात पाच वर्षे कुठे होते तुम्ही? जबरदस्त लोक आहात तुम्ही सगळे. असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. आता या सगळ्या टीकेला अमोल कोल्हे उत्तर देणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

---

# संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ युवासेनेची “मशाल यात्रा”

## वरुण सरदेसाई यांच्यासोबत हाती मशाल घेऊन युवासैनिक सहभागी

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ युवासेनेच्या वतीने शहरात “मशाल यात्रा” काढण्यात आली. युवासेनेचे मुख्य सचिव वरुण सरदेसाई यांच्यासोबत हाती मशाल घेऊन असंख्य युवासैनिक या यात्रेत सहभागी झाले.**



उमेदवार संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ युवा सेनेचे मुख्य सचिव वरुण सरदेसाई यांच्या हस्ते मशाल पेटवून या मशाल यात्रेची सुरुवात रहाटणीतून करण्यात आली. रहाटणी परिसरानंतर काळेवाडी, अमरदीप कॉलनी, पिंपरी बाराजपेठ, डीलक्स चौक, पिंपरीगाव, पिंपरी सौदागर यासह विविध भागातून मशाल यात्रा काढून प्रचार करण्यात आला. या मशाल यात्रेत “जय भवानी, जय शिवाजी”चा जयघोष करीत हातात मशाली घेऊन युवा सैनिंनी मावळ लोकसभा मतदारसंघात येत्या 13 मे रोजी फक्त मशाल हेच चिन्ह लक्षात ठेवण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले.

वरुण सरदेसाई यांच्यासोबत या यात्रेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड . सचिन भोसले, उपजिल्हाप्रमुख रोमी संधू, युवा सेनेचे शहर युवा अधिकारी चेतन पवार, मावळ लोकसभा प्रचार प्रमुख योगेश बाबर, युवा सेनेचे राज्य कार्यकारणी सदस्य योगेश निमसे, गुलाब गरुड, दस्तगीर मणियार यांच्यासह मोठ्या संख्येने युवा सैनेचे पदाधिकारी, युवासैनिक या यात्रेत सहभागी झाले होते. या यात्रेदरम्यान उद्धव ठाकरे साहेबांनी गद्दारांना गाडण्याचा संदेश दिला आहे. तो संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे.

### युवासैनिकांना आवाहन

गद्दारी करणा-यांना आणि उध्दव ठाकरे यांना त्रास देणा-यांना या निवडणुकीत आपल्याला धडा शिकवायचा आहे. मतदारसंघात मशाल पेटवून संजोग वाघेरे पाटील यांना विजयी करायचे आहे. त्यासाठी 13 मे पर्यंत कोणीही गाफील राहू नका, असे आवाहन वरुण सरदेसाई यांनी युवासैनिकांना केले.

# लोकसभा निवडणूक : महायुती-महाविकास आघाडीत

# भोसरीतील गावजत्रा मैदानासाठी ‘रस्सीखेच!

## देवेंद्र फडणवीस यांच्या सभेसाठी महेश लांडगे आग्रही शरद पवार यांच्या सभेसाठी अमोल कोल्हे यांची मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदानापूर्वी वातावरण निर्मिती करण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी सर्व ताकद पणाला लावली आहे. सभा-बैठकांसाठी ठिकाण निश्चित करण्यावरुन दोन्ही प्रतिस्पर्ध्यांमध्ये मोठी चूरस निर्माण झाली आहे. भोसरी येथील गावजत्रा मैदानात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा होणार आहे. त्याच दिवशी महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या सभेसाठी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे या मैदानावर कुणाची सभा होणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**




शिरुर लोकसभा मतदार संघात महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि महाविकास आघाडीकडून डॉ. अमोल कोल्हे निवडणुकीच्या रिंगणात आहे. या मतदार संघातील भोसरी विधानसभा मतदार संघातून भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महायुतीची धुरा हातात घेतली असून, या निवडणुकीत १ लाख मतांची आघाडी आढळराव पाटील यांना देण्याचा दावा केला आहे.

राज्यात लोकसभा निवडणुकीतील चौथ्या टप्प्यात नंदुरबार (ST), जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी (SC), बीड या मतदार संघात दि. १३ मे रोजी मतदान होत आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या प्रदेश नेतृत्त्वाने या मतदार संघातील प्रचारावर आता भर दिला आहे. तिसऱ्या टप्पयातील मतदान दि. ७ मे रोजी झाल्यानंतर चौथ्या टप्प्यातील मोहीमेसाठी दिग्गजांच्या सभांचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी दि. १० मे रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा नियोजित केली आहे. भोसरीतील गावजत्रा मैदानावर ही सभा होणार असून, या ठिकाणी भाजपा महायुतीकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात येणार आहे. मात्र, महाविकास आघाडीकडून याच दिवशी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची सभा घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे दोन्ही प्रतिस्पर्धी उमेदवारांकडून गावजत्रा मैदानावर सभा घेण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

### भोसरी विधानसभा ‘किंगमेकर’



२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना सुमारे ३७ हजाराहून अधिक मतांचे लीड मिळाले होते. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी यावेळी भोसरीवर लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी या निवडणुकीत महायुतीला १ लाख मतांची आघाडी मिळवून देण्याचा निर्धार केला आहे. भाजपा आणि मित्र पक्षांनी निवडणूक प्रचारसाठी कंबर कसली असून, मतदार संघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकदही तुल्यबळ आहे. त्यामुळे महायुतीच्या स्थानिक नेत्यांची एकजूट झाली, तर भोसरी विधानसभा ‘किंगमेकर’ ठरेल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

# शिरुर मतदार संघात भाजपाचा “मास्टर ट्रोक”!

## आमदार लांडगे यांचा मविआला धक्का : ओझर देवस्थानचे गणेश कवडे यांचा भाजपा प्रवेश

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिरुर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने “मास्टर स्ट्रोक” मारला असून, मतदार संघातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र ओझर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश कवडे यांनी अधिकृतपणे भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.**



भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या समन्वयाने आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गणेश कवडे यांनी हातात ‘कमळ’ घेतले. भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी फडणवीस यांची शिरुरमध्ये जाहीर सभा झाली. या सभेत कवडे यांनी भाजपाची पताका खांद्यावर घेतली.

याबाबत आमदार महेश लांडगे यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे श्रद्धास्थान श्रीक्षेत्र ओझर विघ्नेश्वर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष गणेश कवडे यांनी आज राज्याचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत अधिकृत प्रवेश केला आहे. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर विश्वास आणि केंद्र व राज्यातील महायुतीची विकासात्मक धोरणाला जनसामान्यांतून प्रतिसाद मिळत आहे.

शिरुर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा “श्रीगणेशा” निश्चितपणे महायुतीचे उमेदवारशिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासाठी शुभसंकेत ठरेल, असा विश्वास वाटतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी शिरुरमध्ये महायुतीचा उमेदवार विजयी करण्याचा निर्धार भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय आणि मित्र पक्ष महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे, असेही आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे.

### आढळरावांच्या विजयासाठी भाजपा मैदानात...

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात गणेश कवडे काम करीत होते. जुन्नर तालुक्यातील युवा चेहरा आणि ठाकरे कुटुंबीयांचे निकटवर्ती अशी त्यांची ओळख आहे. तसेच, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. महायुतीच्या माध्यमातून शिवाजीराव आढळराव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ‘घड्याळ’ या चिन्हावर लढत आहेत. मात्र, “घड्याळाला मत म्हणजे मोदींना मत...” असा नारा देत भाजपा आढळरावांच्या विजयासाठी मैदानात उतरली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ‘कट्टर समर्थक’ असलेल्या आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून गणेश कवडे यांचा पक्षप्रवेश निश्चित करण्यात आला. त्याद्वारे भाजपाने महाविकास आघाडीला धक्का दिला आहे. अष्टविनायक गणपतीपैकी ओझरचा विघ्नेश्वर, थेऊरचा चिंतामणी, लेण्याद्रीचा गिरिजात्मज आणि रांजनगावचा महागणपती ही तीर्थक्षेत्र शिरुर लोकसभा मतदार संघाअंतर्गत आहेत. पुणे जिल्ह्यातील शहरी-ग्रामीण भागासह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशभक्त आहेत. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक गणपतीपैकी विघ्नेश्वर गणपती देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून गणेश कवडे यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्याचा फायदा महायुतीला होईल, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे.

# भाजपची भाषा बदलू लागली!




**पक्ष संघटनेची प्रचंड ताकद असल्यामुळे हरलेली बाजी शेवटच्या क्षणीही जिंकण्याची ताकद भाजपकडे असली; तरीदेखील पक्षनेत्यांची भाषणे काँग्रेसच्या नावाचे भूत लोकांसमोर पुन्हा उभे करण्याशिवाय पर्याय नसल्यासारखी का होताहेत?**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणांमध्ये आता ‘चारसो पार’चा उल्लेख फारसा होत नाही. भाजपला वा ‘एनडीए’ला किती जागा मिळणार यापेक्षा काँग्रेस पक्ष सत्तेवर आला तर काय होईल यावर मोदी अधिक बोलताना दिसतात. मतदानाचा पहिला टप्पा होण्याआधीची आणि दोन टप्पे झाल्यानंतरची भाजपची भाषा बदलू लागल्याचे दिसते. त्यामागे दोन कारणे असू शकतात : एकतर, आता ‘चारसो पार’बद्दल कशाला बोलायचे, तेवढ्या जागा तर मिळणारच आहेत. हे त्रिकालाबाधित सत्य असेल तर त्यावर बोलण्याची गरज नाही. मोदींनी केलेल्या मेघगर्जनेची पूर्ती होऊ शकते अशी खात्री भाजपला वाटत असावी म्हणून कदाचित ‘एनडीए’ किती जागा जिंकणार यावर अधिक भर दिला जात नसेल. किंवा दुसरी शक्यता अशी की, अपेक्षित लक्ष्य गाठता येणार नाही हे कळून चुकले असावे. त्यामुळे जागांचा विषय न काढता काँग्रेस सत्तेवर येणे कसे अधिक घातक ठरेल याची भीती मतदारांना घातली जात आसावी. त्यातून कदाचित जागांमध्ये



होणारी संभाव्य घट रोखून धरता येईल असेही वाटत असावे. दोन टप्प्यांतील मतदानानंतर दुसरी शक्यता अधिक योग्य ठरते. भाजपकडे पक्ष संघटनेची प्रचंड ताकद असल्यामुळे हरलेली बाजी ते शेवटच्या क्षणीही जिंकू शकतात हे मान्य करावे लागेल. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे पाच टप्पे अद्याप बाकी आहेत. त्यामुळे भाजप प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारच नाही असे नव्हे. गेल्या वर्षी मध्य प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने आघाडी घेतली होती. भाजपचा पराभव होईल असा कयास केला जात होता. मध्य प्रदेशमधील वातावरणही काँग्रेससाठी अनुकूल होते; पण भाजपने मधल्या टप्प्यात बाजी पालटून टाकली. काँग्रेसकडे पक्ष संघटना भक्कम नसल्याने हातचा घास निसटून गेला. पण, आता मध्य प्रदेशमध्ये भाजपला ‘नवी निवडणूक नवी लढाई’ असे म्हणावे लागले आहे. गेल्या आठवड्यामध्ये मध्य प्रदेशच्या मुरैनामध्ये प्रचार सभेला अपेक्षित गर्दी न झाल्याने मोदींनी ग्वाल्हेरमध्ये भाजपच्या नेत्यांसमोर नाराजी व्यक्त केल्याचे सांगितले जाते. मोदींच्या विदर्भातील सभांमध्ये खुर्च्या रिकाम्या होत्या, लोक उठून जात होते. त्याची पुनरावृत्ती मुरैनामध्येही झालेली दिसली. २०१९ मध्ये ज्या राज्यांमध्ये सर्वाधिक जागा जिंकल्या, तिथेही भाजपला या वेळी मेहनत करावी लागत आहे.महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार या तीन राज्यांमध्ये भाजपच्या जागा २०१९च्या तुलनेत कमी होण्याची शक्यता असू शकते. राजस्थानातील नाराज जाट मतदारांनी भाजपविरोधात मतदान केले असेल तर तिथेही काही जागांचा फटका बसू शकतो. गुजरातमध्ये एक जागा जरी काँग्रेस वा ‘आप’ने जिंकली तरीही भाजपचा नैतिक पराभव ठरेल. राजकोटमध्ये भाजपच्या पुरुषोत्तम रुपालांवर क्षत्रिय समाज नाराज आहे. तिथे पाटीदार विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटलेला आहे. उत्तरेकडील अन्य राज्यांतही २०१९मधील सर्वच्या सर्व जागा मिळतील असे नाही. ओदिशा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांतून जागांचा खड्डा भाजपला भरून काढता आला नाही तर भाजपला जेमतेम बहुमतापर्यंत मजल मारता येईल. मतदानाच्या पुढच्या टप्प्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कठीण आव्हान भाजपसमोर उभे राहिलेले आहे. म्हणून भाजप एकेका जागेसाठी धावपळ करताना दिसू लागला आहे. भाजपला खरोखरच ‘चारसो पार’चा पल्ला गाठता येणे शक्य असते तर सुरत आणि इंदूरमधून काँग्रेसच्या उमेदवारांचे ‘अपहरण’ करण्याची गरज पडली नसती. भाजपच्या नेत्यांनी काँग्रेसच्या या उमेदवारांवर कधीकाळी वैयक्तिक उपकार केले असू शकतील, त्याची परतफेड त्यांनी उमेदवारी मागे घेऊन केली असेल. पण मतदारसंघ निवडणुकीविना जिंकून ‘आम्ही लोकशाहीवादी’ असा टेंभा कसा मिरवता येईल असा प्रश्न कोणाच्याही मनात येऊ शकतो. ही लोकशाहीविरोधी पावले भाजपला उचलावी लागतात, कारण त्यांना बहुमताचा आकडा गाठू शकू याची शाश्वती उरलेली नसावी.

## संपादकीय »

### संशयास्पद संवेदना


***केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वास्तव्यानंतरही जेथील कटू वास्तव बदलले नाही, त्या मणिपूरने वर्षभर भोगलेल्या वेदनांचा विसर निवडणूक काळात पडतो आहे...***

वादळात जसे डोळ्यासमोरचे दिसेनासे होते त्याप्रमाणे आपल्या देशात एकदा का निवडणुका जाहीर झाल्या की भल्याभल्यांस दुसरे काही दिसेनासे होते. त्यात या निवडणुकांचे मोठेपण तर काय पाहायलाच नको. ‘चारसो पार’चा नारा काय, विरोधकांचा हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असल्याचा आरोप काय, पाकिस्तानचे शहजादे काय... राजकारण्यांच्या जिभेवर सरस्वतीचे जणू तांडवनृत्य सुरू असल्यासारखे वाटावे अशी मुक्ताफळांची उधळण सध्या आपल्याकडे वातावरणी भरून आहे. गावात जत्रा आली की हौशे, नवशे आणि काही तरी शोधू पाहणारे गवशे कसे तहानभूक हरपून ती मौज पाहण्यास गर्दी करतात तशी आपली सामान्य जनता ही राजकीय शिमग्याची मौज लुटत आहे. त्यात यास ‘देशाचा सर्वात मोठा उत्सव’ असे अधिकृत प्रमाणपत्र दिले गेल्याने कोणास या आनंद(?) सोहळ्याबाबत काही वाटायचे कारण नाही.

स्त्रियांवरील अत्याचार, विनयभंग ही प्रकरणे गंभीरच.माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे पुत्र रेवण्णा आणि नातू खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील लैंगिक शोषणाचे आरोप ताजे असतानाच पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांच्या विरोधात राजभवनातील एका महिला कर्मचाऱ्याने विनयभंगाची तक्रार पोलिसात दाखल केली.

# नारीशक्तीचा सन्मान अशाने वाढतो का?

असून त्याबद्दलही आता निवडणुकीच्या तोंडावर राजकीय खडाष्टके सुरू झाली आहेत. बढतीसाठी आपल्याला दालनात बोलावून दोनदा गैरवर्तन केल्याची महिला कर्मचाऱ्याची राज्यपालांच्या विरोधात तक्रार आहे. पण राज्यपाल बोस यांनी सारे आरोप फेटाळून लावताना ‘राज्यातील दहशतवाद आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात पावले उचलल्याने आपल्या विरोधात मोहीम सुरू झाली’ असा दावा करून सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर खापर फोडले आहे. मूळचे केरळचे असलेले हे आनंद बोस भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी. अशी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल होणे हा गंभीरच प्रकार.राजकीय हेतूने ही तक्रार झाल्याचे राज्यपाल बोस यांचे म्हणणे असले, तरी त्यांनी या प्रकरणात चौकशीला सामोरे जाणे केव्हाही अपेक्षित आहे. तरच सत्य बाहेर येऊ शकेल. पण महिला कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केल्यावर पश्चिम बंगाल



पोलीस दलाला राजभवनात प्रवेशास बंदीच घालण्याचा आदेश राज्यपालांनी दिल्याने साहजिकच संशय बळावला. ‘राज्य पोलीस विभागाकडून कोणतेही समन्स अथवा नोटीस आल्यास त्याकडे दुर्लक्ष करा- दखल घेऊ नका’ असाही आदेश राजभवन कर्मचाऱ्यांना मिळाल्याचे वृत्त आहे. आपण ज्या राज्याचे राज्यपाल आहोत त्याच राज्याच्या पोलिसांना राजभवनात प्रवेशास बंदी घालायची हे राज्याच्या घटनात्मक प्रमुखांना शोभते का? तक्रार राजकीय हेतूने प्रेरित असल्यास राज्यपालांनी स्वत:हून चौकशीचा आदेश देऊन तृणमूल काँग्रेसवर प्रकरण उलटवू शकले असते. पण राजभवनात पोलिसांना बंदी करण्यावर न थांबता, तक्रार दाखल झाल्यावर राज्यपालांनी अचानक केरळमध्ये- कोची येथे जाणे हे विरोधकांनाच बळ देणारे ठरते. कोलकाता पोलिसांनी या चौकशीसाठी महिला पोलीस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली चौकशी पथक नेमले आहे. या पथकाने राजभवनातील सीसीटीव्ही चित्रीकरणाची मागणी राजभवनाकडे केली आहे. त्यास प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमीच. संदेशखाली येथील महिलांवरील अत्याचारावरून भाजपने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात चांगलीच कोंडी केली. पण आता राज्यपालांच्या विरोधात गैरवर्तनाची तक्रार दाखल झाल्याने ममता बॅनर्जी यांना संधीच मिळाली. त्यांनी जाहीर सभेत केंद्राने नेमलेले राज्यपालांचे वर्तन कसे असते हे नमूद करीत संदेशखालीवरून अडचणीत आणणाऱ्या भाजपला प्रत्युत्तर दिले.राज्यातील कायदा व सुव्यवस्था, विद्यापीठांच्या कारभारावरून बोस हे राज्य सरकारला नैतिकतेचे सल्ले देत आले आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वडेट्टीवारांविरोधात भाजपा आक्रमक!

## निवडणूक आयोगाकडे कारवाई करण्याची केली मागणी

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी ही दहशतवाद्याच्या बंदुकीतील नव्हती तर संघाशी समर्थित पोलीस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य ॲड.उज्ज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले, असा दावा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. वडेट्टीवार यांच्या दाव्यानंतर आता भाजपाने आक्रमक भूमिक घेतली असून त्यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. वडेट्टीवार यांचा दावा निराधार व तथ्यहीन असून त्यांनी आचारसंहितेचं उल्लंघन केलं आहे, असे भाजपाने या तक्रारीत म्हटले आहे.**



एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, भाजपाने वडेट्टीवार यांच्या आरोपांनंतर निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी वडेट्टीवार यांचा दावा खोटा असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणीदेखील केली आहे. या पत्राबरोबर भाजपाने याप्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रेदेखील जोडल्याची माहिती आहे.२६/११ मुंबई अतिरेकी हल्ला प्रकरणाचे सर्व पुरावे, साक्षी तपासून न्यायालयाने आरोपी अजमल कसाब याला फाशीची शिक्षा दिली होती. त्यानंतर आरोपी अजमल कसाब याला कन्फर्मेशन केस उच्च न्यायालयात दाखल केली. उच्च न्यायालयानेही अजमल कसाब याची फाशी कायम केली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही अजमल कसाब याची फाशी कायम ठेवली. त्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी जे विधान केले आहे, ते पूर्णपणे चुकीचे आहे व न्यायालयाचा अवमान करणारे आहे, असं भाजपाने या तक्रारीत म्हटलं आहे. वडेट्टीवार यांच्या आरोपांमध्ये पुराव्यांचा अभाव तर आहेच पण राजकीय प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिष्ठेला कलंकित करण्यासाठी ते राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचेही दिसते आहे. अशा कृती निष्पक्ष प्रचाराच्या तत्त्वांचे उल्लंघन करतात आणि निवडणूक आचारसंहितेचा भंग करतात. तसेच अशी विधाने आपल्या सशस्त्र दलांच्या व पोलिसांच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, त्यामुळे निवडणूक आयोगाने वडेट्टीवार यांच्याविरोधात कारवाई करावी, अशी मागणीही या पत्राद्वारे करण्यात आली आहे.आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी ही दहशतवाद्याच्या बंदुकीतील नव्हती तर संघाशी समर्थित पोलीस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य ॲड.उज्ज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले आहे", असे विधान वडेट्टीवार यांनी केले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा या विधानावर स्पष्टीकरण दिले होते. "आपण हे एस.एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकाचा दाखला देऊन बोललो आहे. यामध्ये मी काहीही म्हटले नसून विलासराव देशमुख त्यावेळी म्हणाले होते की, कसाबला फाशी झाली म्हणजे श्रेय घेण्याची गरज नाही. कारण कसाब दहशतवादी होता, त्याला फाशी होणारच होती. त्यामुळे बडेजावपणा दाखवायची गरज नाही. मी एस.एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकाचा दाखला दिला असून याबाबत त्यांकाही खुलासा करायचा असेल तर त्यांनी करावा", असे विजय वडेट्टीवार म्हणाले होते.आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी ही दहशतवाद्याच्या बंदुकीतील नव्हती तर संघाशी समर्थित पोलीस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य ॲड.उज्ज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले.

### निराधार व तथ्यहीन आरोप

वडेट्टीवार यांच्या दाव्यानंतर आता भाजपाने आक्रमक भूमिक घेतली असून त्यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. वडेट्टीवार यांचा दावा निराधार व तथ्यहीन असून त्यांनी आचारसंहितेचं उल्लंघन केलं आहे, असे भाजपाने या तक्रारीत म्हटले आहे.एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, भाजपाने वडेट्टीवार यांच्या आरोपांनंतर निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी वडेट्टीवार यांचा दावा खोटा असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणीदेखील केली आहे. या पत्राबरोबर भाजपाने याप्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रेदेखील जोडल्याची माहिती आहे.२६/११ मुंबई अतिरेकी हल्ला प्रकरणाचे सर्व पुरावे, साक्षी तपासून न्यायालयाने आरोपी अजमल कसाब याला फाशीची शिक्षा दिली होती. त्यानंतर आरोपी अजमल कसाब याला कन्फर्मेशन केस उच्च न्यायालयात दाखल केली. उच्च न्यायालयानेही अजमल कसाब याची फाशी कायम केली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही अजमल कसाब याची फाशी कायम ठेवली. त्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी जे विधान केले आहे, ते पूर्णपणे चुकीचे आहे व न्यायालयाचा अवमान करणारे आहे, असं भाजपाने या तक्रारीत म्हटलं आहे.

# भाजपाकडून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण केला जातो

## 4 जून रोजी देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल : आदित्य ठाकरे

। सोलापूर । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पराभव दिसताच भाजपाकडून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण जातो, अशी टीका ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. तसेच येत्या ४ जून रोजी देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला आहे. ते छत्रपती संभाजीनगरमधील प्रचारसभेत बोलत होते.**

देशभरात भाजपाविरोधी वातावरण आहे. त्यामुळे मतदार आणि गावातील सरपंचांना धमकी दिली जात आहे. भाजपाला त्यांचा पराभव दिसू लागला आहे. पराभव दिसताच भाजपाकडून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण केला जातो. जिथे-जिथे पराभव दिसायला लागतो, तिथे-तिथे भाजपाकडून वेगवेगळ्या पद्धतीने वाद निर्माण केले जातात", अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे. "आज गॅसचे दर १००० पार गेले. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांना त्याचा त्रास होतो आहे. भाजपाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे तसेच प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा करण्याचे आश्वासन



दिले होते. मात्र, ते आश्वासनही भाजपाने पूर्ण केलेले नाही. देशात आज हुकूमशाहीचं वातावरण आहे. भाजपाला देशाच्या संविधानात बदल करायचा आहे", असेही ते म्हणाले.यावेळी बोलताना त्यांनी ४ जून रोजी देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा विश्वासदेखील व्यक्त केला. "भाजपा ४०० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचं स्वप्न बघते आहे. मात्र, त्यांना २०० जागाही मिळणार नाही. त्यामुळे येत्या ४ जूर रोजी देशात इंडिया आघाडीचं सरकार येणार हे निश्चित आहे", "आज गॅसचे दर १००० पार गेले. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांना त्याचा त्रास होतो आहे. भाजपाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे तसेच प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा करण्याचे आश्वासन दिले होते. असे ते म्हणाले. पराभव दिसताच भाजपाकडून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण जातो, अशी टीका ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. तसेच येत्या ४ जून रोजी देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला आहे. ते छत्रपती संभाजीनगरमधील प्रचारसभेत बोलत होते.

### महागाई मोठ्या प्रमाणात वाढली

देशभरात भाजपाविरोधी वातावरण आहे. त्यामुळे मतदार आणि गावातील सरपंचांना धमकी दिली जात आहे. भाजपाला त्यांचा पराभव दिसू लागला आहे. पराभव दिसताच भाजपाकडून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण केला जातो. जिथे-जिथे पराभव दिसायला लागतो, तिथे-तिथे भाजपाकडून वेगवेगळ्या पद्धतीने वाद निर्माण केले जातात", अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे. "आज गॅसचे दर १००० पार गेले. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# ‘आप’ने खलिस्तानकडून निधी घेतला!

## राज्यपालांकडून केजरीवालांच्या चौकशीची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली अबकारी धोरण प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्यावर कारवाई सुरू असतानाच आता त्यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या माध्यमातून केजरीवाल यांची चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. आम आदमी पक्षाला बंदी असलेल्या खलिस्तानवादी संघटनेकडून निधी मिळाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. “सिख फॉर जस्टीस” या संघटनेवर बंदी घालण्यात आलेली आहे. मात्र या संघटनेकडून जवळपास १६ दशलक्ष डॉलर्सचा निधी पक्षाला मिळाला, अशी तक्रार नायब राज्यपालांना मिळाली आहे.**



नायब राज्यपालांच्या सचिवालयाने दिलेल्या माहितीनुसार, १९९३ च्या दिल्ली बॉम्बस्फोटातील आरोपी आणि दहशतवादी देवेंद्र पाल भुल्लरची सुटका करणे आणि खलिस्तानी भावनेचे समर्थन करण्यासाठी हा निधी दिला गेला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. वर्ल्ड हिंदू फेडरेशनच्या आशू मोंगिया यांनी सदर तक्रार नायब राज्यपालांकडे केली.नायब राज्यपाल सक्सेना यांनी केंद्रीय गृह सचिवांना केलेल्या शिफारशीत म्हटले की, बंदी असलेल्या कट्टरपंथी संघटनेकडून निधी मिळाल्याची तक्रार एका विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या विरोधात प्राप्त झाली आहे. त्यामुळे तक्रारदाराने जे इलेक्ट्रॉनिक पुरावे सादर केले आहेत. त्याचे फॉरेन्सिक तपासणी करण्याची आवश्यकता आहे. सक्सेना यांनी गृह मंत्रालयाला असेही म्हटले की, केजरीवाल यांनी जानेवारी २०१४ मध्ये इक्बाल सिंग यांना पत्र लिहिले होते. ज्यामध्ये प्रा. भुल्लर यांची सुटका करण्यासाठी आप सरकारने राष्ट्रपतींना विनंती केल्याचा मुद्दा नमूद केला आहे. तसेच एसआयटी स्थापन करून इतर मुद्द्यांबाबत सहानुभूतीपूर्वक आणि कालबद्ध पद्धतीने काम करेल, असेही आश्वासन या पत्राच्या माध्यमातून देण्यात आले होते.१९९३ साली दिल्लीतील युवक काँग्रेसच्या मुख्यालयाबाहेर झालेल्या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू तर ३१ जण जखमी झाले होते. या प्रकरणी भुल्लरला दोषी ठरविण्यात आले होते. जर्मनीतून हद्दपार केल्यानंतर भुल्लरला अटक करण्यात आली होती. १९९५ पासून भुल्लर तिहार तुरुंगात आहे. ऑगस्ट २००१ साली दहशतवाद आणि फूटीरतावादी कृत्य (प्रतिबंध) कायद्याच्या कलमाखाली भुल्लरला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र २०१४ साली त्याच्या फाशीच्या शिक्षेला जन्मठेपेत बदलण्यात आले.राज्यपालांनी केजरीवाल यांच्या एनआयए चौकशीची मागणी केल्यानंतर आम आदमी पक्षानेही त्याला प्रत्युत्तर दिले आहे. नायब राज्यपाल हे भाजपाचे एजंट असल्याप्रमाणे वागत आहेत. दिल्लीतील सातही मतदारसंघात पराभव दिसत असताना भाजपाने अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात आणखी षडयंत्र रचले आहे, असा आरोप ‘आप’ने केला. तर दिल्लीचे मंत्री सौरभ भारद्वाज म्हणाले की, भाजपाने पंजाब विधानसभा निवडणुकीआधीदेखील हाच आरोप केला होता.दिल्ली अबकारी धोरण प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्यावर कारवाई सुरू असतानाच आता त्यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या माध्यमातून केजरीवाल यांची चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. आम आदमी पक्षाला बंदी असलेल्या खलिस्तानवादी संघटनेकडून निधी मिळाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. “सिख फॉर जस्टीस” या संघटनेवर बंदी घालण्यात आलेली आहे. मात्र या संघटनेकडून जवळपास १६ दशलक्ष डॉलर्सचा निधी पक्षाला मिळाला .

### इलेक्ट्रॉनिक पुरावे केले सादर

१९९३ च्या दिल्ली बॉम्बस्फोटातील आरोपी आणि दहशतवादी देवेंद्र पाल भुल्लरची सुटका करणे आणि खलिस्तानी भावनेचे समर्थन करण्यासाठी हा निधी दिला गेला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. वर्ल्ड हिंदू फेडरेशनच्या आशू मोंगिया यांनी सदर तक्रार नायब राज्यपालांकडे केली.नायब राज्यपाल सक्सेना यांनी केंद्रीय गृह सचिवांना केलेल्या शिफारशीत म्हटले की, बंदी असलेल्या कट्टरपंथी संघटनेकडून निधी मिळाल्याची तक्रार एका विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या विरोधात प्राप्त झाली आहे. त्यामुळे तक्रारदाराने जे इलेक्ट्रॉनिक पुरावे सादर केले आहेत. त्याचे फॉरेन्सिक तपासणी करण्याची आवश्यकता आहे. सक्सेना यांनी गृह मंत्रालयाला असेही म्हटले की, केजरीवाल यांनी जानेवारी २०१४ मध्ये इक्बाल सिंग यांना पत्र लिहिले होते. ज्यामध्ये प्रा. भुल्लर यांची सुटका करण्यासाठी आप सरकारने राष्ट्रपतींना विनंती केल्याचा मुद्दा नमूद केला आहे. तसेच एसआयटी स्थापन करून इतर मुद्द्यांबाबत सहानुभूतीपूर्वक आणि कालबद्ध पद्धतीने काम करेल, असेही आश्वासन या पत्राच्या माध्यमातून देण्यात आले होते.१९९३ साली दिल्लीतील युवक काँग्रेसच्या मुख्यालयाबाहेर झालेल्या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू तर ३१ जण जखमी झाले होते.

# मंत्र्याच्या सचिवाच्या नोकराच्या घरी कोट्यवधींचं घबाड

## ईडीने छापेमारी केली असता 20 कोटींपेक्षा जास्त रक्कम सापडली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेची निवडणूक सुरु असतानाच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) झारखंडमध्ये ९ ठिकाणी छापे टाकले असून यामध्ये कोट्यवधींची रोकड जप्त करण्यात आली आहे. झारखंड सरकारमधील एका मंत्र्याच्या खासगी सचिवाच्या नोकराच्या घरी तब्बल २० कोटी रुपयांपेक्षा जास्त रोकड सापडल्यामुळे मोठी खळबळ उडाली.**

झारखंड ग्रामीण विकास विभागाचे मुख्य अभियंता वीरेंद्र के राम यांना मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात फेब्रुवारी २०२३ मध्ये ईडीकडून अटक झाली होती. या प्रकरणाचा तपास ईडीकडून सुरु होता.याच दरम्यान, झारखंडचे ग्रामीण विकास मंत्री आलमगीर आलम यांचे खासगी सचिव संजीव लाल यांच्या नोकराच्या घरी ईडीने छापेमारी केली असता २० कोटींपेक्षा जास्त रक्कम सापडली आहे. त्यामुळे एका मंत्र्यांच्या खासगी सचिवाच्या नोकराच्या घरी एवढी मोठी रोकड सापडल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, या प्रकरणावर आता काँग्रेसकडून प्रतिक्रिया देण्यात आली आहे. यामध्ये मंत्री आलमगीर आलम यांचे स्वीय सचिव संजीव लाल यांच्या घरातील काम करणाऱ्या नोकराच्या घरातून कोट्यवधींची




रोकड जप्त करण्यात आल्यानंतर काँग्रेस पक्षाने मोठा दावा केला आहे. स्वीय सचिव संजीव लाल यांनी याआधी भाजपाच्या मंत्र्यांच्या स्वीय सचिव म्हणून काम पाहिले असल्याचे म्हटले आहे.संजीव लाल यांच्या घरातील काम करणाऱ्या नोकराच्या घरातून कोट्यवधींची रोकड ईडीने जप्त केल्यानंतर मंत्री आलमगीर आलम यांनी आपला त्याच्याशी काहीही संबंध नसल्याचे म्हटले आहे. अशी माहिती झारखंड काँग्रेसचे प्रवक्ते राकेश सिन्हा यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिली असल्याचे वृत्तात म्हटले आहे. दरम्यान, कोणत्याही मंत्र्याला दोन सचिव असतात. त्यामध्ये एक खासगी आणि दुसरा सरकारी अधिकारी असतो. यामध्ये संजीव लाल हे सरकारी आहेत. मात्र, यापूर्वी ते भाजपाचे माजी मंत्री सी पी सिंग यांचेही सचिव होते, असे राकेश सिन्हा यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता या प्रकरणात ट्विस्ट निर्माण झाला आहे.“आलमगीर आलम यांनी मला (राकेश सिन्हा यांना) सांगितले की, या कारवाईशी आणि जप्त करण्यात आलेल्या पैशाची आपला कोणताही संबंध नाही. राहुल गांधी यांचा झारखंडमध्ये निवडणुकीच्या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर दौरा आहे.

### आलमगीर आलम कोण आहेत?

ते मंगळवारी झारखंडमध्ये येणार आहेत”, असे राकेश सिन्हा यांनी म्हटले आहे. दरम्यान, २०१४ ते २०१९ पर्यंत राज्यमंत्री राहिलेले भाजपा आमदार सीपी सिंग यांनीही इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये म्हटले की, “मंत्रीपदाच्या कार्यकाळात माझे सचिव संजीव लाल होते. मात्र, त्यांच्यापासून मी खूप सावध होतो. पाकूर विधानसभा मतदारसंघाचे आलमगीर आलम हे काँग्रेसचे आमदार आहेत. सध्या ते झारखंड सरकारमध्ये ग्रामीण विकास मंत्री आहेत. तसेच २००६ ते २००९ या दरम्यान ते झारखंड विधानसभेचे अध्यक्षही राहिलेले आहेत. आलमगीर आलम हे चारवेळा आमदार म्हणून निवडून आलेले आहेत.

# तेव्हा माझं करिअर संपेल सलमान खान

बॉलीवूड अभिनेता सलमान खान गेल्या काही दिवसांपासून त्याच्या घरावर झालेल्या गोळीबारामुळे चर्चेत होता. परंतु, सध्या सलमान खानने ३५ वर्षांपूर्वी एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'मैंने प्यार किया' चित्रपटाच्या यशानंतर भाईजानने हे पत्र त्याच्या समस्त चाहत्यांना लिहिलं होतं. तसंच अभिनेता म्हणून प्रेक्षकांनी स्वीकारल्याबद्दल सलमानने त्याच्या चाहत्यांचे आभार मानले होते. सलमानचं हे पत्र मूळ स्वरुपात सिने ब्लिट्ज मासिकात प्रसिद्ध झालं होतं.सलमान खानने त्याच्या पत्रात नेमकं काय लिहिलं होतं याची उत्सुकता अनेकांना आहे. अभिनेत्याने त्याच्या लाखो प्रेक्षकांचे कसे आभार मानले जाणून घेऊयात... सलमान लिहतो, "मला आज तुम्हा सर्वांना माझ्याबद्दल काहीतरी सांगायचं आहे. सर्वप्रथम, एक अभिनेता म्हणून मला स्वीकारल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार...मी माझ्या प्रत्येक चित्रपटात तुमच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. सध्या प्रत्येक चित्रपटाची निवड करण्यापूर्वी मी भरपूर विचार करत आहे. माझ्या विवेकबुद्धीनुसार मी चांगल्या कथांवर लक्ष केंद्रित करत आहे. कारण, मला माहित आहे की, यानंतर मी जे काही चित्रपट करेन त्याची तुलना 'मैंने प्यार किया'शी होणार आहे. त्यामुळे भविष्यात मी जेव्हा पण चित्रपटाची घोषणा करेन तेव्हा खात्री बाळगा की, तो एक चांगला चित्रपट असेल आणि मी त्यासाठी माझे शंभर टक्के देईन."सलमान पुढे लिहितो, "मी तुम्हा सर्वांवर प्रचंड प्रेम करतो आणि आशा करतो की तुम्ही सुद्धा माझ्यावर तसंच प्रेम करत राहाल.

# ३३ वर्षांपूर्वीच्या सुबोध भावेला पाहिलंत का?

चित्रपट असो वा मालिका आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमधून अभिनयाचं कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मन जिंकणारा अभिनेता म्हणजेच सुबोध भावे. सुबोधने त्याच्या पत्नी मंजिरीसाठी एक खास व्हिडी शेअर केला आहे. याबरोबरच तो एक नवीन गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार असल्याचंही सुबोध म्हणाला आहे. याबाबत सुबोधने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये सुबोध भावे म्हणाला, "नमस्कार, आज आमच्या सेटवरून एक खास गोष्ट तुमच्याशी शेअर करायचीय. नवीन, नाजूक, हळूवार रोमँटीक गोष्ट लवकरच घेऊन येतोय मी तुमच्या सगळ्यांसाठी. आजच्या दिवशी ही गोष्ट शेअर करावीशी वाटली कारण आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. आज ६ मे आणि बरोबर ३३ वर्षांपूर्वी १९९१ साली मी मंजिरीला प्रपोज केलं होतं आणि तिने मला हो म्हटलं होतं.""मंजिरी आठवतंय ना आणि कुठे हो म्हटलं होतस हे आठवतय का? पुण्याच्या बालगंधर्वच्या पुलावर. आमची ही लव्हस्टोरी सुरू झाली मग त्याच्यानंतर तिच काही वर्ष इथे असणं. मग अचानक कॅनेडाला निघून जाण. मग ती पत्र, चोरून पाठवलेली पत्र, मित्रांच्या नावाने पाठवलेली पत्र, त्यांची वाट बघण्यात गेलेले अनेक दिवस, मग हळूहळू इमेल्स आणि मग ४ ५ वर्षांच्या विरहानंतर मंजिरी परत आली. आठवतंय का?""पण खर सांगतो तुझ्याबरोबर त्यानंतर आयुष्यातल्या सगळ्या सुख दुखांच्या गोष्टी शेअर केले पण तुझ्याबरोबरची प्रत्येक आठवण ही मात्र गोडच आहे आणि मंजिरी तू मला विश्वास दिलास की जगायला श्वासाची

# नाच गं घुमा!



परेश मोकाशी यांची चित्रपट दिग्दर्शित करण्याची आणि तो हाताळण्याची एक वेगळी हातोटी आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'पासून 'वाळवी'पर्यंत हे आपण लक्षात घेतलं आहेच. आता त्यांचा नवा चित्रपट आला आहे ज्याचं नाव आहे 'नाच गं घुमा' मुक्ता बर्वे, नम्रता संभेराव, सुकन्या मोने, सुप्रिया पाठारे, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठे यांच्या प्रमुख भूमिका असलेला चित्रपट आहे.चित्रपटाची कथा उच्च मध्यमवर्गीय त्रिकोणी घरात घडते. घरात कामासाठी बाई आली नाही किंवा वेळेवर आली नाही किंवा तिने सुट्टीच घेतली तर काय? या आजकालच्या नोकरी करणाऱ्या गृहिणीपुढे पडलेल्या प्रश्नांवर हा चित्रपट आधारलेला आहे. राणी (मुक्ता बर्वे) आणि आनंद (सारंग साठे) यांना शाळेत जाणारी एक मुलगी चिकू (मायरा वायकूळ) आहे. या दोघांनाही नोकरीसाठी जावं लागत असल्याने चिकूला सांभाळण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बारा तास काम करणारी बाई त्यांना हवी आहे. आशाताई (नम्रता संभेराव) या त्यांच्याकडे येतात. पण त्या वेळ पाळत नसतात. म्हणून राणी त्यांना कामावरुन काढून टाकते. पण मग राणी आणि आनंदची पंचाईत होऊ लागते, पण आशाताईना परत काम दिलं जातं. आधी वेळ न पाळणाऱ्या आशाताई वेळेवर येऊ लागतात. नंतर एके दिवशी एक घटना घडते ज्यानंतर राणी अक्षरशः हाताला धरुन हाकलून देते. या सगळ्यानंतर काय काय घडतं?, आशाताई असं काय वागतात? राणीचं काय होतं? आनंदची भूमिका काय? या दोघांच्याही आया घरात राहण्यासाठी येतात तेव्हा काय होतं ? या सगळ्यावर सिनेमा भाष्य करतो.

# बांदेकरांनी सांगितला बॉलीवूडचा अनुभव

सुचित्रा बांदेकर यांनी केवळ मराठीतच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' चित्रपटात त्यांनी साकारलेलं 'सुचित्रा भोसले' हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. याशिवाय त्या रणवीर सिंहबरोबर 'सिम्बा' चित्रपटात झळकल्या होत्या. अलीकडेच त्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजमध्येही झळकल्या होत्या. त्यांचा बॉलीवूडमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत सुचित्रा बांदेकर यांनी भाष्य केलं आहे. सुलेखा तळवलकर यांच्या 'दिल के करीब' कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली होती. बॉलीवूडमध्ये गाजलेल्या 'सिंघम' चित्रपटात काम करण्याची संधी कशी मिळाली याबद्दल सांगताना सुचित्रा बांदेकर म्हणाल्या, ""सिंघम'च्या वेळी मला एका गृहस्थाचा फोन आला होता. त्यांनी मला फोनवर 'सुचित्रा बांदेकर का? आम्हाला तुम्हाला कास्ट करायचं आहे. रोहित शेट्टी प्रोडक्शनमधून बोलतोय.' कारण, मला त्या पहिल्या फोनवर तो 'द रोहित शेट्टी' आहे, तो मोठा दिग्दर्शक असं काहीच सुचलं नाही."सुचित्रा पुढे म्हणाल्या, "त्यानंतर त्या गृहस्थाने मला पुन्हा फोन केला आणि तुम्हाला कळतंय का मला काय म्हणायचंय? असा प्रश्न त्याने मला विचारला. यावर मी म्हणाले.

# कंगनाने अमिताभ यांच्याशी केली तुलना



लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतका आदर करतात. मी दाव्याने सांगू शकते की अमिताभ बच्चन यांच्यानंतर इंडस्ट्रीत इतकं प्रेम व आदर जर कुणाला मिळत असेल तर ती फक्त मी आहे," असं कंगना रणौत प्रचाराच्या भाषणात म्हणाली. कंगना रणौतचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटकरी तिच्या फ्लॉप चित्रपटांचा उल्लेख करत तिला ट्रोल करत आहेत. "कंगनाचा शेवटचा हिट चित्रपट २०१५ मध्ये आला होता आणि त्यानंतर तिने बॅक टू बॅक १५ फ्लॉप चित्रपट दिले आणि इथे ती स्वतःची तुलना अमिताभ बच्चन यांच्याशी करत आहे", अशा शब्दांत कंगनाची खिल्ली उडवत एका व्हेरिफाईड पॅरोडी अकाउंटने तिचा व्हिडीओ शेअर केला आहे.मंडी लोकसभा मतदारसंघासाठी १ जूनला मतदान होणार आहे. हे शेवटच्या, सातव्या टप्प्यातील मतदान होईल. २०१९ मध्ये या मतदारसंघातून भाजपाचे राम स्वरुप शर्मा यांनी निवडणूक लढवली होती व ते विजयी झाले होते. पण २०२१ मध्ये त्यांच्या निधनानंतर या जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रतिभा सिंह विजयी झाल्या होत्या.कंगना रणौत मुळची हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील आहे. याच ठिकाणाहून तिला भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी रिंगणात उतरवलं आहे. याठिकाणी शेवटच्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापूर्वी कंगना रणौत मतदारसंघात फिरून प्रचारसभा घेत आहे. या निवडणुकीत कंगना रणौतला मतदार स्वीकारणार की नाही ते निकालांची घोषणा झाल्यावरच कळेल.लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात.

# धोनीमुळे चेन्नईच्या संघाचे नुकसान

## धोनीच्या फलंदाजी क्रमवारीवर इरफानने उपस्थित केले प्रश्नचिन्ह

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**मागील काही सामान्यांपासून चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी हा सातत्याने खालच्या क्रमांकावर फलंदाजी करतो आहे. रविवारी झालेल्या पंजाब किंग्जविरुद्ध झालेल्या सामन्यातही त्याने ९ व्या क्रमांकावर फलंदाजी येत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. मात्र, धोनीच्या खालच्या क्रमांकावर फलंदाजी करण्याच्या निर्णयावर आता अनेकांकडून टीका करण्यात येत आहे. या निर्णयावर आता भारतीय क्रिकेट संघाचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.**



स्टार स्पोर्टवरील एका कार्यक्रमात बोलताना इरफान पठाणने यासंदर्भात भाष्य केलं आहे. "मला माहिती आहे की धोनीचं वय आज ४२ वर्ष आहे. मात्र, तो सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे त्याने जबाबदारी घेऊन मधल्या फळीत फलंदाजी करणे आवश्यक आहे. त्याने किमान चार ते पाच षटके फलंदाजी करणं गरजेचं आहे. त्याने केवळ फिनिशर म्हणून आपली भूमिका पार पडून नये", अशी प्रतिक्रिया त्याने दिली. पुढे बोलताना तो म्हणाला, "धोनी सध्या शेवटच्या एक किंवा दोन षटकात फलंदाजीला येतो आहे, त्यामुळे चेन्नईच्या संघाचे नुकसान होत आहे. अशाने चेन्नईचा दिर्घकालीन हेतू कधीही साध्य होणार नाही, त्यामुळे कोणीतरी धोनीला सांगाव की त्याने किमान चार किंवा पाच षटकं तरी फलंदाजी करावी"दरम्यान, धोनीच्या फलंदाची क्रमवारीवरून भारतीय संघाचा माजी खेळाडू हरभजन सिंग यानेही नाराजी व्यक्त केली आहे. स्टार स्पोर्ट्सवर बोलताना हरभजन सिंग म्हणाला की, "महेंद्रसिंग धोनीला नवव्या क्रमांकावर फलंदाजी करायची असेल, तर त्याने खेळू नये. त्याच्याऐवजी प्लेइंग इलेव्हनमध्ये वेगवान गोलंदाजाचा समावेश केला, तर ते योग्य ठरेल. माही निर्णय घेणारा माणूस आहे आणि त्याने वरच्या क्रमांकावर फलंदाजीला न आल्याने आपल्या चाहत्यांची निराशा केली आहे."शार्दुल ठाकूर कधीही महेंद्रसिंग धोनीसारखे फटके मारू शकत नाही. त्यामुळे धोनीने ही चूक का केली हे माझ्या समजण्यापलीकडे आहे. त्याच्या परवानगीशिवाय काहीही घडत नाही आणि फलंदाजी क्रमवारीत बदल करण्याचा हा निर्णय दुसऱ्या कोणीतरी घेतला यावर मी विश्वास ठेवायला तयार नाही. धोनीने गेल्या काही सामन्यांमध्ये चेन्नई सुपर किंग्जसाठी झटपट धावा केल्या आहेत. पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जला याच गोष्टीची गरज होती." अशी प्रतिक्रियाही त्याने दिली. मागील काही सामान्यांपासून चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी हा सातत्याने खालच्या क्रमांकावर फलंदाजी करतो आहे. रविवारी झालेल्या पंजाब किंग्जविरुद्ध झालेल्या सामन्यातही त्याने ९ व्या क्रमाकांवर फलंदाजी येत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. मात्र, धोनीच्या खालच्या क्रमांकावर फलंदाजी करण्याच्या निर्णयावर आता अनेकांकडून टीका करण्यात येत आहे. या निर्णयावर आता भारतीय क्रिकेट संघाचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. स्टार स्पोर्टवरील एका कार्यक्रमात बोलताना इरफान पठाणने यासंदर्भात भाष्य केलं आहे. "मला माहिती आहे की धोनीचं वय आज ४२ वर्ष आहे. मात्र, तो सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे त्याने जबाबदारी घेऊन मधल्या फळीत फलंदाजी करणे आवश्यक आहे. त्याने किमान चार ते पाच षटके फलंदाजी करणं गरजेचं आहे.

### हरभजननेही केली नाराजी व्यक्त

पुढे बोलताना तो म्हणाला, "धोनी सध्या शेवटच्या एक किंवा दोन षटकात फलंदाजीला येतो आहे, त्यामुळे चेन्नईच्या संघाचे नुकसान होत आहे. अशाने चेन्नईचा दिर्घकालीन हेतू कधीही साध्य होणार नाही, त्यामुळे कोणीतरी धोनीला सांगाव की त्याने किमान चार किंवा पाच षटकं तरी फलंदाजी करावी"दरम्यान, धोनीच्या फलंदाची क्रमवारीवरून भारतीय संघाचा माजी खेळाडू हरभजन सिंग यानेही नाराजी व्यक्त केली आहे.मागील काही सामान्यांपासून चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी हा सातत्याने खालच्या क्रमांकावर फलंदाजी करतो आहे. रविवारी झालेल्या पंजाब किंग्जविरुद्ध झालेल्या सामन्यातही त्याने ९ व्या क्रमाकांवर फलंदाजी येत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

# सूर्यकुमारचे शतक हैदराबादवर पडलं भारी

## मुंबई इंडियन्सने व्याजासकट घेतला हैदराबादचा बदला

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सूर्यकुमार यादवच्या झंझावाती शतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सने ७ विकेट्सने हैदराबादवर विजय मिळवला. मुंबई इंडियन्सने या विजयासह हैदराबादकडून मागील सामन्यातील पराभवाचा बदला घेतला. सूर्यकुमार यादवने ५१ चेंडूत १२ चौकार आणि ६ षटकारांच्या जोरावर १०२ धावांची तुफान खेळी केली. एकटा सूर्याचं हैदराबादच्या संघावर भारी पडला आणि पराभवासह हैदराबादला प्लेऑफमध्ये जाण्यासाठी अधिक खडतर प्रवासाचा सामना करावा लागणार आहे.**



सूर्याला तिलक वर्माने चांगली साथ देत ३२ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. हैदराबादने दिलेल्या १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सूर्याने ६ धावांची गरज असताना विजयी षटकारासह लक्ष्य पूर्ण केले. मुंबईने १७.२ षटकांत हे लक्ष्य सहज गाठले.१७३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबईने चांगली सुरूवात केली. इशान किशनने पहिल्या २ चेंडूवर शानदार चौकार लगावले, तर रोहितने पहिल्याच षटकात एक चौकार लगावला. तर दुसऱ्या षटकात इशान किशनने चांगले शॉट्स खेळले पण तो यान्सनच्या गोलंदाजीवर बाद ९ धावा करत बाद झाला. यानंतर कमिन्स आणि भुवनेश्वरचे षटक मुंबईला धक्के देणारे ठरले. रोहित शर्मा ४ धावा करत कमिन्सच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. तर नमन धीरला ९ चेंडूत एकही धाव करता आली नाही आणि तो खातेही न उघडता बाद झाला. या सलग दोन धक्क्यांनंतर पुन्हा मुंबई इंडियन्स गडबडणार असे वाटले पण सूर्यकुमारने संघाचा डाव उचलून धरला.सूर्यकुमार यादव सुरूवातीच्या काही चेंडूवर बाद होता होता वाचला पण तो मैदानात टिकून राहिला. त्यानंतर आलेल्या तिलक वर्माने त्याला शेवटपर्यंत चांगली साथ दिली. सूर्या चांगली फटकेबाजी करत होता तर संधी मिळताच तिलकनेही आपले फटके दाखवून दिले.

### अभिषेक शर्मा 11 धावा करत बाद

कमिन्सच्या भेदक गोलंदाजीला सडेतोड उत्तर देत तिलकने एक शानदार चौकार लगावला आणि त्यानंतर दोघांनी फटकेबाजी सुरू केली मग संघाला विजय मिळवूनच हे दोघे परतले. तिलकने ३२ चेंडूत ६ चौकारांसह ३७ धावा केल्या. तत्पूर्वी नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या हैदराबादची फलंदाजी बाजू आज शांत होती. मुंबईच्या गोलंदाजांनी आपली उत्कृष्ट गोलंदाजी दाखवत हैदराबादच्या धावांना ब्रेक लावला. हैदराबादने हेडच्या ४८ धावा आणि कमिन्सच्या ३५ धावांच्या खेळीसह १७३ धावा केल्या. हेडला सामन्यात दोनदा जीवदान मिळाले पण तो मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. बुमराहच्या गोलंदाजीसमोर अभिषेक शर्मा ११ धावा करत बाद झाला. तर हैदराबादचे इतर फलंदाजही २० धावांचा आकडा न गाठताच माघारी गेले.